

नचिकेत जोशी

# सह्यांकन

साहित्य प्रतिष्ठान®

# सह्यांकन

नचिकेत जोशी

ई साहित्य प्रतिष्ठान

**पुस्तकाचे नांव सह्यांकन**

**प्रकार : ट्रेक प्रवास वर्णन**

**लेखक : नचिकेत जोशी ( nachiket.xcoepian@gmail.com )**

**9423235553**

**सर्व फ़ोटो: नचिकेत जोशी**

**पूर्वप्रसिद्धी -**

**१. माझा ब्लॉग - anandyatra.blogspot.in**

**२. मायबोली.कॉम ('आनंदयात्री' या आयडीने)**

**ई पुस्तक निर्मिती: सुनिल सामंत**

**प्रकाशन: ई साहित्य प्रतिष्ठान**

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.
- या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

**©esahity Pratishthan® 2012**

अर्पणपत्रिका

मोहिमा कशा आखाव्यात आणि पार पाडाव्यात

याचा शिवरायांनी घालून दिलेला वस्तुपाठ आचरणात आणणाऱ्या

आणि सह्याद्रीवर मनापासून प्रेम करणाऱ्या

सर्व आधुनिक 'चक्रम' मावळयांना

# 'सह्यांकन' च्या मोहिमेवर 'निघण्या'पूर्वी थोडंसं हितगुज

वाचकहो नमस्कार!

'भैरवगड : केवळ थरारक' या पुस्तकानंतर ई-साहित्य प्रतिष्ठानतर्फे तुमच्या भेटीला येत असलेलं हे माझं दुसरं पुस्तक. असंख्य वाचकांनी फोन, इमेल, ब्लॉगवर भैरवगडाबद्दलचं ते पुस्तक आवडल्याचं कळवलं. आणि "पुढचं पुस्तक केव्हा" याचीही विचारपूस नेमाने सुरू ठेवली होती. मुलुंडच्या 'चक्रम हायकर्स' तर्फे आयोजित “सह्यांकन” या सुरेख भटकंतीवरचं हे पुस्तक तुमच्या स्क्रीनवर (किंवा मोबाईलवर) ठेवताना मला खूप आनंद होतोय. पाच दिवस आम्ही भटकलेला तो सारा मुलुख तुम्हाला सभोवताली जाणवेल, आणि आम्ही मनमुराद उपभोगलेल्या त्या आनंदात तुम्हीही सहभागी होऊ शकाल असा विश्वास वाटतो.

हे पुस्तक आपल्यापर्यंत पोचवणाऱ्या, आणि हेच नव्हे तर अशी असंख्य ई-पुस्तके वाचकांपर्यंत मोफत पोचवणाऱ्या ई-साहित्य प्रतिष्ठानच्या पडद्यामागच्या सर्व टीमचे मनापासून कौतुक आणि आभार!

- नचिकेत जोशी

# सह्यांकन २०११ - भाग १

## पूर्वतयारी आणि प्रस्थान

नेहमीप्रमाणे डिसेंबर उजाडला, वाटा-खोपटांमध्ये उतरलेली थंडी हाडांमध्ये शिरू लागली आणि नेहमीप्रमाणे वेध लागले ते सह्याद्रीमधल्या मोठ्या भ्रमंतीचे! २००९ मध्ये तोरणा ते रायगड, २०१० मध्ये बागलाण प्रांतातली ४ किल्ले आणि २ सुळक्यांची भटकंती असे सलग दोन डिसेंबर सार्थकी लावल्यानंतर यंदा काय, हा प्रश्न जसा अचानक पडला तसा ताबडतोब सुटलाही! आणि उत्तर होते - चक्रम हायकर्स, मुलुंड, आयोजित "सह्यांकन २०११"!

१९८३ पासून 'चक्रम' दरवर्षाआड 'सह्यांकन' या नावाने सह्याद्रीमधली दीर्घमुदतीची मोहीम आयोजित करते. यंदाच्या मोहिमेचा प्लॅन पुढीलप्रमाणे होता -



दिवस १ - रात्री मुलुंडहून प्रयाण, ढाकोबा पायथ्याच्या सिंगापूर (पळू) गावामध्ये मुक्काम.

दिवस २ - आंबोली घाटाने चढून ढाकोबा पायथा गाठणे व मुक्काम.

दिवस ३ - ढाकोबा डोंगर पाहून, उतरून दुर्ग किल्ल्याकडे प्रयाण, दुर्ग किल्ला पाहून, पायथ्याच्या दुर्गवाडीपासून हातवीज-डोणी मार्गे अहुपे येथे मुक्काम.

दिवस ४ - अहुपेहून गायदराघाटमार्गे सिद्धगडमाची, सिद्धगडकिल्ला पाहून पुन्हा माचीवर मुक्काम.

दिवस ५ - गायदराघाट चढून भट्टीच्या रानातून कोंडवळमार्गे भीमाशंकर व मुक्काम.

दिवस ६ - भीमाशंकरहून पदरगड पाहून, गणेशघाटाने खांडस येथे उतरून "सह्यांकन २०११"ची सांगता.

मोहिमेचा नकाशा - (सौजन्यः 'चक्रम'ची वेबसाईट)

(प्लॅनमध्ये नकाशापेक्षा काही बदल झाले होते- दुसऱ्या  दिवशी दुर्गवाडीऐवजी आम्ही ढाकोबा पायथ्याला मुक्काम करणार होतो आणि चौथ्या दिवशी तावलीघाटातून साखरमाचीमार्गे न जाता गायदऱ्याच्या पठारावरूनच गायदरा घाट उतरून सिद्धगड गाठणार होतो)

यातले बरेचसे भाग उदा. अहुपे ते भीमाशंकर, भीमाशंकर ते खांडस, दुर्ग-ढाकोबा, सिद्धगड, पदरगड हे एकेकटे ट्रेक म्हणून करता येतात. पण एकाच मोहिमेत या सर्वांना जोडून घेणाऱ्या काहीशा परिचित-अपरिचित वाटांनी भ्रमंती हे यंदाच्या 'सह्यांकन'चे वैशिष्ट्य होते. आमची संपूर्ण मोहीम तशाच वाटांनी पार पडल्यामुळे संपूर्ण वर्णनामध्ये कदाचित काही अनवट वाटांबद्दल वाचायला मिळेल.

मला स्वतःला 'चक्रम'च्या 'सह्यांकन'बद्दल खूप उत्सुकता होती. चोख संयोजनासाठी 'सह्यांकन'चे आणि पर्यायाने 'चक्रम'चेही अतिशय आदराने नाव घेणारे अनेक जण भेटले होते. त्यामुळेच सह्यांकन २०११ च्या तारखा आल्या आल्या, ऑफिसमधून पाच दिवसांची सुट्टी टाकली आणि पहिल्याच बॅचमध्ये नाव नोंदवून टाकले. माझा खूप जुना आणि पहिल्यापासूनचा ट्रेकमित्र मयूरही येणार होता, पण त्याला आयत्यावेळी हापिसने परदेशी पाठवल्यामुळे अखेर मोहीम सुरू होताना माझ्या बॅचमध्ये मला ओळखणारा असा मीच एकटा उरलो. तसेच आमच्या बॅचमध्ये (होतकरू, हौशी इ) फोटोग्राफरही मी एकटाच असल्यामुळे या पूर्ण मोहिमेमध्ये माझे स्वतःचे फोटो कमी घेतले गेले आहेत (तुम्ही आनंदाने टाकलेला सुटकेचा निश्वास मी ऐकलाच नाही बरं!)

सह्यांकनच्या आयोजनाबद्दल खरंतर स्वतंत्र लेख लिहावा लागेल. थोडक्यात सांगायचे तर अतिशय सुनियोजित, शिस्तबद्धरित्या आखलेली आणि मुख्य म्हणजे गेली २८ वर्षे नियमितपणे सुरू असलेली एक प्रचंड दुर्गमोहीम असं वर्णन करावं लागेल. नाष्टा-चहा-जेवण - संयोजकांतर्फे! कसल्याही, अगदी कसल्याही अडचणीला तोंड द्यायला दांडगा अनुभव असलेल्या कार्यकर्त्यांची फळी टप्प्याटप्प्यावर सज्ज! खरं सांगतो, सह्यांकन म्हणजे खाण्यापिण्याची चंगळ! (ते वर्णन पुढे येईलच).

सह्यांकनसाठी माझी तयारी नाव नोंदवल्या दिवसापासूनच सुरू झाली. नवे शूज, स्लीपिंग बॅग इथपासून सराव म्हणून ढाकबहिरी आणि भैरवगड असे दोन पावरफुल ट्रेकही करून झाले. ११ डिसेंबरच्या pre-सह्यांकन गटगमध्ये 'आपल्या बॅचमध्ये जवळजवळ सगळेच पन्नाशीच्या आसपासचे तरूण आहेत' हा नवा शोध लागला आणि मी पुरता बेचैन झालो! "इतका मोठा ट्रेक करायला हे वय योग्य आहे का" हा पहिला आणि 'इतर' उरलेले प्रश्नही शेवटपर्यंत मनातच राहिले. हां हां म्हणता दिवस उलटले आणि पाच दिवसांच्या मोठ्या, दीर्घ, खडतर, कष्टप्रद इ इ (स्वतःहून ओढवून घेतलेल्या) पायपीटीच्या प्रस्थानाचा दिवस उजाडला. मी पहिली बॅच घेतल्यामुळे १९ डिसेंबरला रात्री मुलुंडहून निघायचे होते.

११ तारखेच्या गटगमध्ये 'चक्रम'च्या एका पदाधिकाऱ्याने वेळेचे महत्त्व बराच वेळ भाषण करून समजावून दिले होते. काय वाट्टेल ते झाले तरी गाडी नऊ वाजता सुटेल, तुम्ही साडेआठलाच हजर रहा अशी भक्कम तंबीही होती. त्यामुळे १८ तारखेला जरी 'उद्या गाडी साडेनऊला सुटेल' असा 'चक्रम'मधून निरोप आला असला तरी मी उगाच 'बस मिस' व्हायला नको म्हणून जेवण सोडून आठ वाजताच चक्रमच्या ऑफिसमध्ये पोचलो. आणि तिथे गेल्यावर कळले, की काही खरंच अपरिहार्य कारणामुळे बस अनिश्चित काळ उशीरा येणार आहे! ('सह्यांकन'चं आयोजन हे खरंच एक प्रचंड मोठं काम आहे, त्यात अशा आयत्यावेळेच्या अडचणींना गोष्टींना संयोजकांना सामोरे जावंच लागतं. आमच्यानंतर एकाही बॅचला असा उशीर झाला नाही, हे उल्लेखनीय!)

या सुरूवातीच्या सगळ्या भ्रमनिरासामध्ये एकच गोष्ट अत्यंत आनंददायी होती, ती म्हणजे आमच्या बॅचचा लीडर - विनय नाफडे उर्फ लांबा! वय ५० च्या आसपास, तरीही, हक्काने ज्याला 'अरे लांबा' म्हणू शकतो असा एकदम मस्त माणूस! साडेसहा फूट उंच हे व्यक्तिमत्त्व अजब आहे! गेल्या पस्तीस वर्षांपासून ट्रेक करत असलेल्या या माणसाकडे अनुभवाबरोबरच अफाट एनर्जी, कुठल्याही (लिटरली कुठल्याही) विषयावर तासनतास बोलण्याची तयारी, उत्तम विनोदबुद्धी, आणि कमालीचा खेळकर पण तोडफोड स्वभाव हे सद्गुण अगदी ठासून भरले आहेत. सह्यांकनप्रमाणेच लांबाचीही सत्कीर्ती मी ऐकली होती.

त्यामुळे हा आपला लीडर आहे म्हटल्यावर मी तर अगदी ज्जामच खूष झालो होतो. लीडरप्रमाणेच बॅचमध्येही एक एक नमुने भेटले. एक गोष्ट फार उत्तम झाली ती म्हणजे, बॅचची पटसंख्या अवघी १७ होती. पण त्यात वय वर्षे १३ पासून ५७ पर्यंतची व्यक्तिमत्त्वे एकत्र आली होती. दोन शाळकरी मुले सोडली तर तिशीच्या आतला तरूण वगैरे मी एकटाच होतो. त्यातला एक तर आत्ता दहावीमध्ये शिकतोय. तो मोहिमेमध्ये आलेला पाहून मी त्याच्या ('अविचारी', पाल्याकडे 'दुर्लक्ष' करणाऱ्या) मातापित्यांच्या धाडसाला मनातूनच साष्टांग नव्हे, दशांग नमस्कार घातला.

अखेर, बस यायला पावणेबारा वाजले. मग विलंबाबद्दल त्या पदाधिकाऱ्याचा औपचारिक माफीनामा पार पडला आणि आम्ही सर्वांनी झोप पूर्ण होण्यासाठी लवकर बस सोडायची असल्यामुळे तो लग्गेच (मौनानेच) स्वीकारलाही! बस सुरू झाली आणि आम्ही सर्व आपापल्या सीटवर झोपलो सुद्धा! लांबा बहुधा जागा होता.

सिंगापूरला पोहोचलो तेव्हा पहाटेचे तीन वाजले होते. बसमधून उतरल्या उतरल्या अंधारात डोळे फाडून आजूबाजूला बघत असताना अचानक चिरपरिचित नानाच्या अंगठ्याने दर्शन दिले. म्हणजे पलिकडचा कडा हा नाणेघाट असणार!

एका शाळेच्या खोलीत आणि व्हरांड्यात निवासाची सोय होती. तिथे आम्ही आपापले बिछाने अंथरले. मुक्कामाच्या ठिकाणी अतिशय उशीरा पोहोचल्यामुळे उद्या साडेसात ऐवजी एक तास उशीरा निघायचे आहे, असे लीडर्सने डिक्लेअर करून जरासा दिलासा दिला. वद्यपक्षातली चंद्रकोर उगवली होती. व्हरांड्याच्या समोर उरलेल्या अंधारात जीवधन किल्ला आणि व्हरांड्यामध्ये पांघरूणांमध्ये आम्ही साडेतीन वाजता गुडूप झालो होतो.

गेले दोन महिने केवळ मनातल्या मनातच कैकदा पूर्ण केलेली सह्यांकन मोहीम प्रत्यक्ष सुरू व्हायला आता फक्त पाच तास उरले होते...



# सह्यांकन २०११ - भाग २

## आंबोली घाट आणि मुक्काम ढाकोबा पायथा

डोंगरामध्ये स्वच्छ हवेमुळे चार तासाची शांत झोपही पुरेशी असते असं म्हणतात. त्या दिवशी पळू-सिंगापूरमध्येही असंच झालं. साडेतीनला झोपूनही साडेसहालाच जाग आली तेव्हा बरंच फ्रेश वाटत होतं. व्हरांड्यातून बाहेर आलो तेव्हा, समोर जीवधन किल्ला, वानरलिंगी आणि डाव्या हाताला नाणेघाटाच्या पठाराचा उंचवटा दिसत होता. सिंगापूर गाव जीवधन किल्ला आणि आंबोली घाट यांच्या मधल्या डोंगराच्या पायथ्याशी वसले आहे. दोनदा चहा आणि विलासदादाच्या हातचे फस्क्लास पोहे हादडल्यावर ओळखपरेड झाली. सुदैवाने अतिशय अनुभवी मंडळी आमच्या बॅचमध्ये होती. काही जण हिमालयात ट्रेक केलेले तर काही यापूर्वीच्या ५-६ 'सह्यांकन' मध्ये सहभागी झालेले होते. तो अनुभव पाहता आपले हे पहिलेच 'सह्यांकन' आहे असे वाटून अचानक मीच स्वतःला अतिशय क्षुद्र जीव समजायला लागलो.

'चक्रम'तर्फे सर्वांना टोप्या आणि स्लिंग(कधी चढ-उताराला आधार म्हणून वापरायचा ८-१० फुटी रोप) वाटपाचा कार्यक्रम पार पडला. कॅरीमॅट सॅकला कशाने बांधायची हा मला पडलेला प्रश्न त्या स्लिंगने कायमचा सोडवला. 'चक्रम' आम्हाला (खऱ्याखुऱ्या) टोप्या घालणार आहे हे आधीच समजल्यामुळे मी घरून निघतानाच टोपीचे ५० ग्रॅम वाचवले होते.

निघा, निघा असं एकमेकांना म्हणत पॅक-लंच (सॉस आणि पराठे) सोबत घेऊन सर्वांनी निघायला ९ वाजले. संपूर्ण मोहिमेमध्ये आम्हा सहभागी लोकांमुळे झालेला हा एकमेव उशीर! सुरूवातीला सपाटीवरून चालत आंबोलीघाटाच्या पायथ्याशी पोचायचे होते.



उभे डावीकडून - महेश शिंगणे उर्फ यत्ता दहावी, अभिषेक शिंगणे, शंतनु अभ्यंकर(उलटी टोपी), लीडर सौरभ भिडे उर्फ बल्लू, लीडर लांबा, विद्या कामत, सुहास कुलकर्णी, आठवले काका(पांढरी दाढी), विनायक कर्वे, रोहित पाटकर, ललिता, लहू डफळे, मिलिंद हर्डीकर. बसलेले डावीकडून - रूची गोसालिया उर्फ सीओईपी, पंक्ती शाह उर्फ टीचर, जय उर्फ यत्ता आठवी, सचिन करंबेळकर, प्रसाद (श्री. ललिता) व फोटॉ काढणारे अस्मादिक)

'चक्रम'तर्फे सर्वांना टोप्या आणि स्लिंग(कधी चढ-उताराला आधार म्हणून वापरायचा ८-१० फुटी रोप) वाटपाचा कार्यक्रम पार पडला. कॅरीमॅट सॅकला कशाने बांधायची हा मला पडलेला प्रश्न त्या स्लिंगने कायमचा सोडवला. 'चक्रम' आम्हाला (खऱ्याखुऱ्या) टोप्या घालणार आहे हे आधीच समजल्यामुळे मी घरून निघतानाच टोपीचे ५० ग्रॅम वाचवले होते.

निघा, निघा असं एकमेकांना म्हणत पॅक-लंच (सॉस आणि पराठे) सोबत घेऊन सर्वांनी निघायला ९ वाजले. संपूर्ण मोहिमेमध्ये आम्हा सहभागी लोकांमुळे झालेला हा एकमेव उशीर! सुरूवातीला सपाटीवरून चालत आंबोलीघाटाच्या पायथ्याशी पोचायचे होते.



जीवधन किल्ला आणि वानरलिंगी -

खास सह्यांकनसाठी पायलटवीरांनी आखलेले (मोहीम ठरवताना जे ट्रायल ट्रेक केले जातात, त्यांना पायलट ट्रेक किंवा रेकी असं म्हणतात) दिशादर्शक बाण पळूपासूनच दिसायला सुरूवात झाल्यावर माझा पुरता हिरमोड झाला.

आता वाट चुकायची शक्यता जवळजवळ शून्य होती! हे वाट चुकण्याचं आणि स्वतः शोधण्याचं लागलेलं वेड हा भटकंतीचा खराखुरा प्राण म्हणायला हवा!

सुरूवातीला थोडा वेळ सपाटीवरून चालल्यावर जेव्हा डोंगरपायथा आला आणि झाडीत शिरायची वेळ आली, तेव्हा लांबाने 'मी वाट दाखवतो' असे म्हणून लीड करायला सुरुवात केली, आणि ताबडतोब आम्ही वाट चुकलो! मी अर्थातच तुडुंब खूश झालो. खरं सांगायचं तर, वाट चुकली की ट्रेक अफलातून होतो, यावर माझा अनुभवांती पूर्ण विश्वास बसला आहे. मोहिमेच्या पहिल्याच तासात वाट हरवल्यामुळे आता संपूर्ण मोहिम अत्यंत यशस्वी होणार याबद्दल माझ्या तरी मनात कुठलीच शंका उरली नव्हती. मग लाकडे तोडणारा एक गावकरी भेटला. त्याला खिंडीची वाट दाखवण्यासाठी तयार केले आणि आम्ही पुढे निघालो.



वाटेत एका पाण्यापाशी विश्रांती घ्यायला थांबलो. आणि लांबामहाराजांनी इथे 'जॅक अँड जिल' या बालपणी शिकलेल्या एका रम्य कवितेवर आख्यान सुरू केले. खजुर, गोळया, चिवडा, चकल्या असा मनमुराद पोटभर फराळ झाल्यावर ते आख्यानही संपले आणि आम्ही पुढे निघालो.

ही वाट खडतर आणि अत्यंत अनियमित चढाची आहे. कमालीचा दमवणारा आंबोली घाट चढून खिंडीत पोचलो तेव्हा ढाकोबाच्या पहिल्या कॅंपचे लीडर आमच्या स्वागताला उभे होते. खरं म्हणजे, काल रात्री आणि त्यामुळे आज सकाळी निघायला झालेला उशीर ऐकून ते 'घाट बऱ्यापैकी उतरून जावी लागेल' अशा विचारानेच आले होते, पण आमच्या वेगामुळे आम्हीच त्यांना वर 'खिंडीत गाठले' होते.




इथपर्यंत पोचण्यासाठी आम्हाला साडेतीन तास लागले होते. पळूपासून इथपर्यंत पोचायला पायलटवीरांनी जवळ जवळ ७ तासांचा टाईमलॉग दिला होता. यावरून आपल्या बॅचमध्ये वयाने मोठे (म्हातारे म्हणायचा मोह आवरता घेतो आहे) असले तरी मोठ्या मोहिमेसाठी पूर्ण तयार असे वीर आहेत याची झलक बघायला मिळाली.




आंबोली घाटाची ही नाळेसारखी दिसणारी वाट

ढाकोबाचे कँपलीडर MB, अक्षय दांडेकर उर्फ दांडू आणि सुदीप आमच्यासाठी सरबत घेऊन आले होते. खिंडीतून वर अर्धा-पाऊण तास चढून दोनच्या सुमारास ढाकोबाच्या जुन्या देवळापाशी पोचलो. तिथे जेवणाचा कार्यक्रम पार पडला.

आता तासभर सपाट पठारावरून चाललो की कँपमध्ये पोहोचणार होतो. मध्ये एक रॉकपॅच पार करून पुढे जावे लागते.

वरच्या पठारावर पोचलो की पळू गावाच्या विरूद्ध बाजूचा नजारा दिसतो. आंबोली गाव या बाजूला आहे.









तुम्ही कधीतरीच ट्रेकींग करता, आम्ही रोज करतो, असंच बहुधा यांना सांगायचं असेल -

इथून डोंगरमाथ्यावरूनच वळसे घेत घेत वाट ढाकोबा डोंगराकडे जाते. वाट अजिब्बात चुकू नये म्हणून ही दक्षता - ठराविक अंतरावर मारलेले तीन बाण या फोटोत दिसत आहेत.



वाटेवर ढाकोबा डोंगराचे झालेले पहिले दर्शन




आमच्या वेळापत्रकानुसार आम्ही आज ढाकोबा पायथ्याला मुक्काम करणार होतो. दूरवर कँपचे तंबू दिसू लागले आणि सकाळपासूनच्या पायपिटीचा विसर पडला. ढाकोबाकडे जाणाऱ्या वाटेपासून थोडंसं पुढे पश्चिमेकडे कलणाऱ्या सूर्याला पाठीशी ठेवून कँप उभा होता. दक्षिणेकडे मोकळं पठार, उत्तरेकडे देवराई, साधारण उगवतीला ढाकोबा डोंगर असा सुंदर आसमंत सोबत होता.



आजची संपूर्ण वाटचाल संपवून संध्याकाळी पाच वाजता कँपमध्ये पोचलो तेव्हा स्वागताला एक बॅनर सज्ज होता. कँपची व्यवस्था अतिशय नेटकी

होती. सुका व ओला कचरा टाकायला, तसंच पिण्यासाठी आणि वापरायच्या पाण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था होती. सहभागी भटक्यांसाठी मोठे दोन आणि कँपलीडर्ससाठी छोटे तीन तंबू उभे होते. बाकी सगळा 'मामला' उघड्यावरच होता.




कँपवर पोचल्यावर एका कँपलीडरने काय करायचे नाही, कुठे जायचे नाही याच सूचना दिल्या. त्यांचा सारांश, जो आम्ही नंतर आठवून आठवून लक्षात ठेवला, तो असा होता -

१. सूर्यास्तानंतर व सूर्योदयापूर्वी विहीरीवर जायचे नाही. (मग जायचे कधी? यावर 'आत्ता' हे उत्तर मिळाले!)

२. तंबूच्या भिंतींना सॅक टेकून ठेवायच्या नाहीत.

३. तंबूच्या मधल्या खांबाला तसेच बाहेरच्या दोऱ्यांना धक्का लावायचा नाही.

४. डबा टाकायला (याचा अर्थ विचारू नका) अमुक एका दिशेला जायचे नाही.

५. रात्री उठायचे झाल्यास एकट्याने उठायचे नाही. (अजून एकाची झोपमोड करायची)

६. मोजे तंबूमध्ये न्यायचे नाहीत. इ.इ.

(यानंतर 'चुळा भरताना आवाज करायचा नाही' अशा खास पुणेरी प्रकारची एखादी सूचना येते की काय असं वाटायला लागलं होतं, पण तशी सूचना नाही मिळाली.) साहजिकच, पुढचे चार दिवस हा बिचारा सूचनादाता सूचना कशा द्याव्यात आणि देऊ नयेत

यासाठी आमच्या बॅचभर आणि पुढील सर्व कँप्सवर प्रसिद्ध झाला! गरमागरम कचोरीचा नाष्टा आणि चहा झाल्यावर आम्ही तंबूमध्ये सॅक लावल्या आणि फ्रेश व्हायला विहीरीवर गेलो. सूर्यास्त दुर्ग किल्ल्याच्या पाठीमागे होणार असल्यामुळे मनासारखा देखावा बघायला मिळणार नव्हता.



अंधार पडल्यावर स्टार्टर म्हणून रस्सम तयार होते. रस्समपान झाल्यावर काही कँपलीडर्स जनरेटर सुरू करण्याच्या खटपटीला लागले आणि उरलेले आमच्यासोबत वर्तुळ करून मैफल जमवून बसले. विडंबने, कविता, भटसाहेबांच्या गझल, किस्से, चारोळ्या यांचा उगवत्या चांदण्याच्या छपराखाली मोकळ्या सपाटीवर साधारण तासभर रंगलेला तो कार्यक्रम कायम लक्षात राहिल! मध्येच दोन-तीन उल्काही पडताना पाहिल्या. खगोलपंत दांडूने त्यावर थोडी माहितीही पुरवली.

थंडी आणि वारा दोन्ही जोरदार होते. बरोब्बर साडेआठला जेवणाची हाक आली आणि आम्ही तंबूमध्ये शिरलो. तुपातला शिरा, पुऱ्या, उसळ, पापड, भात-मुगाची आमटी असा अत्यंत अनपेक्षित भरगच्च मेनू पानात आल्यावर आमची बोलती बंद झाली आणि हाता-तोंडाची गाठ पडली!

जेवणानंतर आकाशाकडे पाहिलं, तेव्हा वर समस्त चांदण्यांचं संमेलन भरलेलं होतं. व्याध, वृषभ रास, सप्तर्षी, मृगाच्या दिशेने रोखलेला बाण (बस! मला एवढंच कळतं...) असे मानवी मनावर परिणाम करणारे असंख्य ज्ञात-अज्ञात स्वयंप्रकाशी घटक तिथे रोजच्यासारखे जमा झाले होते. आम्हीच त्यांना नवखे होतो. 'जगात ठराविक काळाने घडलेल्या अशुभ घटनांच्या वेळी आकाशातील ताऱ्यांची तीच विशिष्ट स्थिती दिसली होती' - इति लांबा! आणि मग पुढची पंधरा मिनिटे लांबाने समजेल अशा भाषेत मेदिनीय ज्योतिष्यशास्त्र आणि जरा वेळाने तो विषय बदलत ज्ञान मिळवण्याचे मार्ग, तीन प्रकारची कर्मे (प्रारब्ध, संचित आणि क्रियमाण) यावर (उभ्या उभ्या) आख्यान दिले. 'समोरच्याला झेपेल असे उदाहरण दिल्यास विषयामधली गोडी वाढते' हे माझे जुने मत लांबाने पुन्हा अधिरेखित केले. त्याला जेवणाची हाक आली, म्हणून नाईलाजाने तो विषय थांबवावा लागला आणि आम्ही तंबूकडे परतलो.

बाहेर थंडी वाढली होती. अजून चार पूर्ण दिवसांची मोहीम बाकी होती. थंडीमुळे थकवाही जाणवत होता. उगाच रिस्क नको म्हणून गरम पाण्याबरोबर औषध घेतले आणि स्लीपिंग मॅटमध्ये शिरलो. झोपल्यानंतर बहुतेक थोड्याच वेळात घामाघूम होऊन जागा झालो, आणि घाम पुसून पुन्हा झोपलो एवढंच आठवतं आता....



आजचा हिशोबः

दिनांक - २० डिसेंबर २०११

एकूण चाल - अंदाजे १० किमी.

वैशिष्ट्यः अंदाजे साडेतीन हजार फूट चढून चार हजार फुटांवर मुक्काम. अवघड, कंटाळवाणा आंबोली घाट पार.

# सह्यांकन २०११ - भाग ३

## ढाकोबा, दुर्ग आणि मुक्काम अहुपे व्हाया हातवीज

साडेपाचला शिट्टी मारून लीडर्सलोकांनी सर्वांना उठवलं. आणि काही 'लाडू' तरीही अंथरूणात पडून राहिले होते, म्हणून त्यांना येऊन पेशल ट्रीटमेंट देऊन उठवलं. 'मोहिमेमध्ये वेळा पाळल्या गेल्याच पाहिजेत' या एकमेव सर्वोच्च नियमाची काटेकोर अंमलबजावणी सुरू झाली होती. गरमागरम बेड-टी तंबूबाहेरच्या लाकडी कट्ट्यावर तयार होता. 'साडेसहाला पीटीसाठी सर्वांनी शूज घालून आणि सॅक पॅक करूनच यायचे आहे' - इति सौरभ उर्फ बल्लू, आमचा मुख्य लीडर. (लांबामहाराज को-लीडर होते). नाही म्हटलं तरी, इतकी थंडी, त्यात वेळेच्या नियमांनी बांधलेला ट्रेक करायची सवय नाही, पहिल्याच दिवशी आतली सर्व 'प्रेशर्स' वेळेवर येतीलच याची खात्री नाही वगैरे वगैरे गोष्टींचा परिणाम म्हणून मी साडेसहाला धापा टाकत तंबूकडे परतलो तेव्हा, सॅक पॅक करायची बाकी होती आणि शूजही चढवायचे बाकी होते. माझ्या हंटर शूजच्या बांधलेल्या लेसकडे पाहून - 'XXXच्या, उद्या डोंगरामध्ये जर कुणाच्या मदतीसाठी १० सेकंदात शूज काढून XXXला पाय लावून पळायची वेळ आली तर काय करणार आहेस? एक सेशन घ्यायला हवं यावर!' (लांबाच! दुसरं कोण बोलणार इतक्या प्रेमळ भाषेत!)



पीटीसाठी सगळे जण वर्तुळात उभे राहिलो. पीटी म्हणजे इतक्या मोठ्या पायपीटीसाठी शरीराच्या स्नायूंना मोकळे करण्याचे बेसिक व्यायामप्रकार होते. पण त्या ढाकोबाच्या पायथ्याच्या पठारावर उगवतीच्या सूर्याला साक्षी ठेवून सर्वांची वर्तुळातील पीटी हे एक सुंदर दृश्य होते.



पीटी संपली आणि मी सॅक बांधायला पळालो. कमीत कमी आकाराची, सॅकमध्ये बसेल अशी स्लीपिंग बॅगची गुंडाळी करणे हा ट्रेकमधला एक अतिशय कंटाळवाणा प्रकार असतो. सकाळी सॅक भरताना 'नकोच ही स्लीपिंग बॅग' हा एकमेव विचार असतो. (रात्री थंडी वाजायला लागली की काय विचार असतो, ते सांगायला नकोच!) तात्पर्य, पुढच्या ट्रेकला एक 'जादूची' सॅक आणायची हा विचार मी नक्की केला आणि बाहेर आलो. गरमागरम साबुदाण्याची खिचडी तयार होती! अन् त्या खिचडीची चव काय सांगू राजांनु!! केवळ अप्रतिम! सगळ्यांनीच ढाकोबा लगेचच चढायचा आहे हे विसरून यथेच्छ हादडलं. अर्थात पूर्ण मोहिमभर सर्व जेवण, नाष्टा, चहा अनलिमिटेड होतं, हा भाग वेगळा!

बरोब्बर साडेसात वाजता आम्ही १७ 'वारकरी' दोन लीडर्स आणि दोन कँपलीडर्सच्या सोबत ढाकोबाकडे निघालो. अर्धा-पाऊण तास चालून ढाकोबावर पोचलो.

४१४८ फूट उंचीचा ढाकोबा हा डोंगरच आहे, किल्ला नाही! घाटाखालून वर चढणाऱ्या अनेक छोट्या मोठ्या वाटांवर लक्ष ठेवायला वगैरे याचा उपयोग होत असावा. इथून व्ह्यू मात्र जबरी दिसतो. माझ्या मते नाणेघाटाचे पठार सर्वात देखणे जर कुठून दिसत असेल, तर ते ढाकोबावरून!






फोटोत जीवधन किल्ला, वानरलिंगी, काल जिथून चढलो ती दरी आणि आजूबाजूचा परिसर

मागे भैरवगडावरून नाणेघाट-नानाचा अंगठा पाहिले होते. त्याच्या बरोब्बर पलिकडच्या बाजूने इथून बघता येते. त्याच रेषेत दूरवर सिंदोळा किल्ला दिसतो. पश्चिमेकडे दुर्ग, थोडंसं उजवीकडे खूप मागे गोरखगड - मच्छिंद्रगड असे ओळखीचे दोस्त दर्शन देतात. ढाकोबावर भन्नाट वारा सुटला होता. थोडा वेळ तिथे टाईमपास करून खाली उतरलो. पुन्हा कँपवर पोचलो तेव्हा नऊ वाजले होते. पॅक-लंच व सॅक घेऊन साडेनऊ वाजता निघायचे होते. त्याप्रमाणे घड्याळाने काटे त्या जागी नेल्यावर आमची परेड निघाली. आता लक्ष्य होते दुर्ग किल्ला!

ढाकोबाला उजव्या हाताला ठेवून झाडीतून एक वाट दुर्ग किल्ल्याकडे जाते. ही वाट बरीच लांब आहे. दोन डोंगर उतरून-चढून असे दोन अडीच तास चालल्यावर एकदाचे आम्ही दुर्ग किल्ल्याच्या पायथ्याशी पोचलो.

दुर्गच्या वाटेवरच्या एका पठारावर घेतलेला फोटो. मागे जिथून निघालो होतो तो ढाकोबा डोंगर.



दुपारच्या बाराच्या उन्हात किल्ला चढायचा होता खरा! पण पायथ्यापासून किल्ला अगदी दहा-पंधरा मिनिटात चढून होतो. दोन्ही बाजूला पूर्ण झाडी आहे. पायथ्याला दुर्गादेवीचे अतिशय सुंदर, शांत मंदिर आहे.



उंचीने ढाकोबापेक्षा कमी असलेल्या या किल्ल्यावर (उंची - ३८५५ फूट) बघण्यासारखे काहीही नाही. तटबंदी, दरवाजे कधीकाळी असलेच, तर आता पूर्ण पडले आहेत. दुर्गला पोहोचण्यासाठी थेट आंबोलीपासूनही वाटा आहेत.

उतरल्यावर थोडीशी विश्रांती घेऊन एक वाजता आम्ही डोणीच्या दिशेने चालायला सुरूवात केली. या फोटोत पुढचा दुर्ग व मागचा ढाकोबा.



डोणी हे पुणे जिल्ह्यातल्या आंबेगाव तालुक्यातलं एक छोटंसं गाव. इथून अहुपेपर्यंत आमच्यासाठी

जीपड्याची सोय केलेली होती. दुर्गवाडीपासून एक वाट दरीत उतरून पलीकडचा डोंगर चढते. त्या सपाटीवर जुन्नर तालुक्यातलं हातवीज हे गाव आहे.

या विहीरीपाशी ती पायवाट हातवीजमध्ये येते.



त्या गावातूनच पुढे आणखी एक पठार पार करून वाट दरीमध्ये उतरते.



उतार उतरून एका ओढ्याच्या काठी आम्ही दोन वाजता जेवणाच्या पुड्या सोडल्या. बसल्या बसल्याच थोडा वेळ झोपून तीन वाजता ओढ्यापलीकडचा चढ चढायला सुरूवात

केली. इतके खाल्यानंतरही ज्या गतीने तो खडा चढ चढून आम्ही सगळे वर पोचलो, ते पाहून हा सह्याद्रीही सुखावला असेल (असं मलाच वाटत राहिलं).

'घामाशिवाय शरीरामध्ये कुणीच बोलत नसताना' एक माणूस मात्र याला अपवाद होता - तो म्हणजे अर्थातच लांबा! अर्थात, सचिन करंबेळकर नावाचे सर्वात वडील असलेले काकाही (काका फक्त म्हणायला, एरवी मी त्यांना 'अहो सचिन' म्हणूनच हाक मारली असती!) लांबाला हळूहळू जॉईन होऊ लागले होते. अतिशय मिष्कील, नकलाकार सचिननी (ब्रँच मॅनेजर, एसबीआय, लालबाग म्हणून आमच्यातील 'लालबागचा राजा') अख्खा ट्रेकभर आम्हाला प्रचंड हसवलं.

तर, तो चढ चढल्यावरही वाटेत डोणीच्या वाड्या-उपवाड्या लागल्या. घेवड्याची शेतं डोलत होती.




तिथून पुढे बरंच चालल्यावर अखेर साडेचारच्या सुमारास आम्ही डोणीला पोहोचलो. आमचा जीपवाला गायब होता. मग तिथेच एका घर कम दुकानाच्या ओसरीवर सगळे पसरलो. फोटोत भगव्या टी-शर्टमधली व्यक्ती म्हणजे 'सचिन करंबेळकर'.




वाट पाहून अखेर जीपऐवजी एका टेंपोतून पुढे निघायचे ठरवले. टेंपोमध्ये उभं राहण्यापेक्षा डायवरच्या डोक्यावरच्या टपावर बसलेलं चांगलं म्हणून आम्ही काही लोकांनी तिकडे मोर्चा वळवला. वाटेत झालेला सूर्यास्त त्या हलत्या टपावरूनच टिपला आणि अर्ध्या तासात ते अंतर पार करून अहुपेला पोचलो.

अहुपेला स्वागताला SAP (सह्यांकन आयोजक प्रमुख) अनिकेत उर्फ पप्पू आणि गॅरीकाका (गॅरीकाका म्हटल्याचं त्यांना कळलं तर माझी काही खैर नाही, असं मला सांगण्यात आलं आहे!) हजर होते. कमालीच्या खर्जातल्या आणि एकाच पट्टीतल्या गूढसम आवाजात गॅरीकाकांनी उच्चारलेलं 'त्या तिकडे एक मंदिर आहे, त्याचे दर्शन घेऊन या' हे वाक्य सचिनने (नेमकं) 'त्या तिकडे दरी आहे, काल तिथे ३ मर्डर झाले, दोन सुसाईड केसही आहेत आणि आज तुम्ही आलात' असं काहीतरी ऐकलं आणि आम्हाला हसून लोळायला अजून एक मुद्दा मिळाला.

ते मंदिर पाहून आम्ही अहुपे टॉप बघायला गेलो. अहुपेजवळचं ते पठार विलक्षण सुंदर आहे. अतिशय विस्तीर्ण असं माळरान, कड्याच्या टोकाशी असलेली दोनच झाडं, समोर

खोल दरी, खाली खोपीवली गाव, डाव्या हाताला डोंगराआडून गोरख-मच्छिंद्रगडाचे डोकावणारे सुळके, मावळलेला सूर्य आणि कातरवेळ.... तिथे माझ्यातल्या मी मनभर राहून घेतलं...



पुन्हा माघारी येऊन अहुपे गावातल्या शाळेकडे, जिथे आमचा कँप होता, निघालो. दिवसभराच्या पायपीटीनंतरही संध्याकाळच्या त्या प्रहरी, त्या सुनसान रस्त्यावरून अंधुक प्रकाशात, टॉर्च वगैरे अजिबात न लावता, सर्वात शेवटी मी एकटाच चालत होतो. ट्रेकमध्ये अशा स्वतःबरोबर राहण्याच्या वेळा अगदी ओढून स्वतःजवळ घ्याव्याशा वाटतात.

अहुपे कँपमध्ये पोचलो तेव्हा सात वाजले होते. सकाळी ढाकोबाकडे निघाल्यापासून तब्बल साडेअकरा तासांनी आम्ही मुक्कामाच्या ठिकाणी आलो होतो. चहा-शंकरपाळे



झाल्यावर स्वीट कॉर्न सूप आलं. (मी फक्त कॉर्नच शोधून खाल्ले). राहायची सोय आज खोल्यांमध्ये होती (म्हणजे चैन होती!). जनरेटरच्या कृपेमुळे लाईट होते. जेवणात पिठलं-भाकरी, कोशिंबीर, पापड, आमटी-भात असा फर्मास मेनू होता.

जेवताना मला चांगलीच थंडी वाजायला लागली. बाहेर गार वाराही सुटला होता. मोहिमेचे दोन दिवस संपले होते. मोहीम अंगात चढू लागली होती. वेळापत्रक ठरलेले होते. त्यात कुठलाही बदल होणार नव्हता. उद्या गायदऱ्याने उतरून सिद्धगड गाठायचा होता. उद्याही बरीच चाल होती. झोप पुरेशी मिळणे आता आवश्यक होते. त्यामुळे कालच्याप्रमाणे कुठलीही मैफल, गप्पाटप्पा आज जमल्या नाहीत. जेवून स्लीपिंग बॅगमध्ये शिरलो आणि माझ्या बाजूलाच 'घोरासूर ऑफ द बॅच' असूनही कसलाही अडथळा न येता स्वस्थ झोपूनही गेलो.



आजचा हिशोबः

२१ डिसेंबर २०११

एकूण चाल - अंदाजे १२ किमी.

वैशिष्ट्यः प्रामुख्याने दुर्गवाडी-हातवीज-डोणी ह्या अनवट वाटेने भ्रमंती. नियमीत चढ-उतार तसेच सपाटीवरून चिक्कार पदभ्रमण.

# सह्यांकन २०११ - भाग ४ :

## अहुपे ते सिद्धगड व्हाया गायदरा घाट

अहुप्याच्या शाळेत अतिशय शांत झोप लागली, आणि पहाटे पाच वाजताच मी जागा झालो. मीच काय, सगळेच्या सगळे शिट्टी वाजायच्या आधीच जागे झाले होते आणि बेड-टीची वाट बघत बसले होते. हे सातत्य पुढचे तीन दिवसही टिकून राहिले.

'पाणी कमी असल्यामुळे सर्वांनी सिद्धगडमाचीला पोचल्यावर दात घासायचे आहेत' हा फतवा निघाला. मी मात्र वेळ वाचला म्हणून खूश झालो! तसंही भल्या पहाटे सव्वापाचला 'विसर्जना'साठी दूरवर फेरफटका झाल्यामुळे कंटाळा आलाच होता. मग दोन-तीन चॉकलेट्स चघळली आणि सर्वात आधी सॅक पॅक केली, शूज चढवले आणि पीटीसाठी कॅमेरा घेऊनच बाहेर आलो. पूर्व समोरच्या बाजूला असल्यामुळे सूर्योदय दिसण्याची शक्यता होती.




पीटी झाली, आणि नाष्ट्याला गरमगरम पोहे समोर आले. मग पुन्हा चहा, ओळखपरेड (आदल्या दिवशी ओळखपरेड बाकी होती) झाली आणि बरोब्बर साडेसातला आम्ही कँप सोडला. अहुपेमधली ही शाळा, जिथे आम्ही काल मुक्काम केला होता -




आज सुरूवातीच्या टप्प्यात प्रचंड लांबलचक गायदऱ्याच्या पठारावरून चालून मग घाट उतरायचा होता. समोर दिसणाऱ्या टेकाडावरून पुढे सुंदर, शांत रानातून वाट जाते -

त्या टेकडीवरून घेतलेला अहुपे गावाचा फोटो -






अहुपे ते गायदरा टॉप हे अंतर कापायला अर्ध्या तासाच्या विश्रांतीसह आम्हाला सव्वातीन तास लागले. वाटेत एके ठिकाणी बाजूच्या पायवाटेवर 'B' लिहिलेला, उलट दिशेने जाणारा बाण दिसला. याचा अर्थ, उद्या इथपर्यंत माघारी येऊन त्या वाटेने भीमाशंकरकडे जायचे होते. त्या बाणापासून गायदरा टॉप फक्त पंधरा मिनिटावर होता, हे सुदैव! जवळच पायवाटेच्या बाजूला एक विहीर दिसली आणि आम्ही तिथे थोडावेळ रेंगाळलो. (दात घासायचे बाकी होते, आठवयंय ना?)




गायदरा टॉपला पोहोचलो तेव्हा पावणेअकरा झाले होते. या फोटोतील कातळ उतरून पुढे निघालो.

A म्हणजे अहुपे, B म्हणजे भीमाशंकर, आणि S म्हणजे सिद्धगड -




गायदरा घाट म्हणजे आधी घळीसारख्या वाटेने थोडे अंतर चालल्यावर झाडीतून जाणारा दगड-धोंड्यांचा अनियमित उतार! क्षणाक्षणाला गुडघ्यांवर इतका ताण येत होता, की थोड्या वेळाने काटकी मोडल्याचा आवाज सुद्धा गुडघ्याच्या वाटीनेच केलेला आवाज नाही ना, असे (मला) वाटायला लागले होते! रात्री जेवताना वाट्या कमी पडल्या तर गुडघ्यातल्या दोन काढून देता येतील असेही वाटायला लागले होते. साखरमाचीचा अवाढव्य डोंगर उजव्या बाजूला ठेवून ही वाट खाली उतरते. वाटेत एके ठिकाणापासून डाव्या डोंगराआड दूरवर सिद्धगडाची माची हळूच डोकावते. ती पाहिल्यावर खाली उतरल्यानंतरही अजून तास-दीड तास चालायचे आहे, ही जाणीव होतेच!

गायदऱ्याच्या याच वाटेवर मी आणि लांबा सर्वात पुढे चालत असताना 'एमबीए परीक्षांचे बदलते स्वरूप आणि भविष्य' नावाच्या शीर्षकविरहीत विषयावर पाऊणतास एकतर्फी संवाद केला. म्हणजे फक्त मी बोलत होतो आणि लांबा ऐकत होता. हा क्षण भाग्याचाच! लांबा इतक्या आज्ञाधारकपणे ऐकत होता, की शेवटी मला असेही वाटायला

लागले होते की हा भोळा बनून माझी परीक्षा घेतो आहे! आमच्या त्या गप्पा सिद्धगडकँपचे लीडर्स राजेश, पिनाक पुराणिक उर्फ पिपु, अनिकेत (हा अनिकेत वेगळा. हा मला स्वभावाने अतिशय गरीब वगैरे वाटला) आणि शार्दूल दिसेपर्यंत सुरू राहिल्या.

'तुम्हाला एवढा उशीर का झाला? तुम्ही इथे दहा वाजता पोचणार असं आम्हाला (घरून) लिहून देण्यात आलं होतं' - इति राजेश! तो उतार उतरून आल्यावर दमसास घेत असताना हा प्रश्न ऐकल्यावर माझे पुढचे एक-दोन श्वास घ्यायचेच राहिले! कुठल्या पायलटवीराने अहुपेपासून इथपर्यंतचे अंतर अडीच तासात काटून होईल हा टाईमलॉग दिला असावा हे कळेना! आमची गती व विश्रांती हे गणित पाहता आम्ही बऱ्यापैकी वेग राखून होतो हे नक्की होते! शेवटी आमची बॅच किती फास्ट चालते वगैरे त्याला उदाहरणासहित समजावून दिल्यावर तो दुसऱ्या बॅचेससाठी उद्यापासून साडेअकराला यायला तयार झाला! मागचे लोक्स बरेच मागे होते. एक तर चढावर फुल फॉर्ममध्ये असणारी आमची बॅच उतारावर सपाट व्हायची! त्यामुळे सर्वांची वाट न बघता, दोन कँपलीडर्सना घेऊन आम्ही पाच-सहा लोक्स पुढे निघालो आणि एमबीए परीक्षांवरील 'चालतं' चर्चासत्र लांबाने आपणहून पुन्हा सुरू केलं.

(त्या वरच्या फोटोमधल्या तीन बाणांपैकी "A"वाल्या बाणाकडून आलो असतो, तर आम्ही दहा-साडेदहापर्यंत पोचलो असतो, हे मागाहून कळलं.)

वळणावळणांची, झाडीतली पायवाट दोन डोंगरांना वळसा मारून तास-सव्वातासाने दमदम्याच्या खाली आणि सिद्धगडाच्या समोर येते (सिद्धगड आपल्या समोर असतो, दमदम्या डाव्या हाताला).

सिद्धगडाचा (माचीचा) पडका दरवाजा सुंदरच आहे!




इथून उजव्या हाताला वळून चार-पाच फर्लांग (एक फर्लांग म्हणजे किलोमीटरचा सहावा भाग) चाललो की आपण सिद्धगडमाची या गावात पोचतो. आम्ही कँपमध्ये पोचलो तेव्हा एक वाजून गेला होता. कँपप्रमुख विंदावहिनींनी सर्वांचं हसऱ्या चेहऱ्याने स्वागत केलं आणि थोड्याच वेळात भाजी-पोळीचं जेवण समोर आलं.

आम्ही पोचायच्या दोन दिवस आधी कँप लागला होता. पायथ्याच्या बोरवाडी गावातून २५ किलोंची पंचवीस पोती (तर मुलामुलींनो, सांगा बरं एकूण किती किलो?) इतके कँपचे सामान (शिधा, लॉजिस्टीक्स इत्यादी) त्यांनी स्थानिक गावकऱ्यांच्या मदतीने वर चढवले होते. सर्वच कँप्स कमी-अधिक प्रमाणात अशाच पद्धतीने लागले होते.

जेवल्यावर अडीच वाजता सिद्धगडाच्या दिशेने निघालो. सिद्धगड माचीची उंची २०२० फूट, तर सिद्धगडाची उंची ३२१६ फूट! म्हणजे आजच्या उरलेल्या दिवसात साधारण बाराशे फूट अजून चढून उतरायचे होते. सॅक्स कँपवरच ठेवल्या आणि पिट्टू

सॅकमध्ये पाण्याच्या बाटल्या घेऊन निघालो. सोबत राजेश-पिपु-अनिकेत आणि स्थानिक गावकरी रमेश येणार होते. इथून वरच्या अंगाला 'बाबाची गुहा' आहे.




एका सधन गृहस्थाने संसारातून विरक्ती घेऊन पूर्वी या गुहेत मुक्काम ठोकला होता. त्याचा मुलगा त्याला सर्व शिधा दर आठवड्याला आणून देत असे. गुहेमध्ये फरशा घातलेल्या आहेत. (थोडक्यात अलिशान निवास होता). 'त्याच्या हातच्या चहाची चव अप्रतिम असायची तसेच तो तिथे जाणाऱ्या सर्वांना चहा आग्रहाने पाजायचा' अशी आठवण मी ऐकली. सध्या ते बाबाजी पुन्हा मुलाकडे राहायला गेले आहेत असेही ऐकले. पण पंचक्रोशीमध्ये बाबाजी प्रसिद्ध होते, हे मात्र नक्की!

मग बाबांच्या गुहेमध्ये थोडा 'प्रकाश टाकला' -






या फोटोत समोर साखरमाची डोंगर आणि उजव्या हाताला दमदम्या डोंगर. साखरमाची डोंगराच्या खालच्या झाडीत साखरमाची गाव आहे. साखरमाची आणि दमदम्या यांच्यामधल्या घळीत गायदरा घाट आहे. दमदम्याच्या पायथ्याच्या जंगलभागातून सकाळी आम्ही आलो होतो. यावरून वाचक वाटांचा अंदाज लावू शकतील.

गुहेपर्यंतची वाट सरळ चढाची आहे. खरी मजा गुहेपासून पुढे येते. अरूंद चढ, मागे थेट दरी आणि थोडीशी स्क्री (सुटे दगड, वाळू, माती) अशी रंगतदार वाट आहे. मोहिमेमध्ये पहिल्यांदाच अशी वाट अनुभवत होतो.



वर पोचलो तेव्हा चार वाजले होते.



कोण्या एके काळी उभ्या असलेल्या पडक्या वाड्याच्या दरवाजाची कमान -

सिद्धगडाच्या माथ्यावरून दिसणाऱ्या दृश्याचे वर्णन करायला शब्द अपुरे पडतील. दक्षिणेला दूरवर भीमाशंकरचे पठार (जिथे आम्ही उद्या असणार होतो), नागफणी, त्याच्या उजवीकडे खाली पदरगड, त्याच्या मागे लांबवर पेठचा किल्ला (कोथळीगड), सिद्धगडाच्या पायथ्याला बोरवाडी गाव, हुतात्मा भाई कोतवालांच्या स्मारकाचे बांधकाम, वायव्येकडे बदलापूरचा बारवी डॅम, उत्तरेकडे गोरखगड, त्याच्या मागून हळूच डोकावणारा मच्छिंद्रगड, साखरमाचीचा डोंगर व झाडीतले साखरमाची गाव, आणि त्याच्या मागे अहुप्याचा डोंगर, त्याच्या उजवीकडे दमदम्या आणि राजाची लिंगी! (प्रस्तरारोहणासाठी गिर्यारोहक जे छोटे-मोठे सुळके निवडतात त्यांना लिंगी म्हणतात). याठिकाणी स्वतःभोवती एक प्रदक्षिणा पूर्ण झाली! (हरये नमः हरये नमः |). उपलब्ध हवामानामध्ये आम्हाला एवढं पाहायला मिळालं. हवा अजून स्वच्छ असती तर कदाचित अजूनही एखादा किल्ला दिसला असता. फोटो घेण्याइतकी स्वच्छ हवा नसल्यामुळे ते फोटो घेता आले नाहीत.

पण सिद्धगडाच्या एका टोकापाशी जाऊन घेतलेले हे फोटो - ह्या त्रिकोणी पठाराच्या उंचीवर सिद्धगडमाची गाव आहे.




झूम करून सिद्धगडमाची गाव -




उतरतांना तर अधिक थरार होता. कारण - तेच नेहमीचेच! दरी डोळ्यांसमोर असणार होती! पण लीडर्सलोकांनी कडक शिस्तीमध्ये सर्वांना खाली आणले. लांबाने तर मला

'बाबाच्या गुहेपाशी जाईपर्यंत मोठमोठ्याने बडबडलास तर वरून दगड मारेन' असा सज्जड दम दिला होता. (मग मी गुहेपर्यत पिपुला पुणेकर वर्सेस मुंबईकर वरून छळत बसलो होतो. तोही काही कमी नव्हता हे लिहिणे महत्त्वाचे!). उतरेपर्यंत अंधार पडला होता. माचीवर पोचलो तेव्हा साडेसहाच्या अंधुक प्रकाशात सिद्धगड-दमदम्याची फक्त किनार दिसत होती. फ्रेश होऊन आलो आणि (इथे पहिल्यांदाच) ओळखपरेड झाली. आतापर्यंत आम्ही एकमेकांची ओळख करून देण्याइतके सर्वांना ओळखू लागलो होतो. तो कार्यक्रम छानच रंगला.

जेवायला व्हेज पुलाव व दाल आणि भजी असा मेनू होता. भरपेट जेवून व्यायामशाळेमध्ये आलो. (मुक्कामाची सोय तिथे होती. कृपया गैरसमज नसावाच!) पायांना तेल लावायची इच्छा झाली. माझ्याकडे तेल होतेच. पण लांबाकडेही एक असरदार वारीचे तेल होते (आषाढीच्या वारीमध्ये वारकऱ्यांच्या पायाला मोफत मालीश करायचे बहुगुणी तेल). 'तू करणार की करून द्यायला हवंय?' - इति लांबा! मग लगेचच पायाला मालिश करण्यासाठी मी याचक बनून लांबापुढे 'पाय पसरून' बसलो. सहभागी सभासदांची स्वतःहून सेवा करणारा असा लीडर आतापर्यंत पाहिला नाही! थोड्याच वेळात अजून दहा पावले लांबासमोर जमा झाली. तो कार्यक्रम पार पडल्यावर अंथरूणावर अंग टाकलं तेव्हा दहा वाजून गेले होते. गेल्या दोन दिवसांपेक्षा झोपायला थोडा उशीरच झाला होता. पडल्यापडल्या झोप लागली, हे सांगणे न लगे!



आजचा हिशेबः
२२ डिसेंबर २०११
एकूण चाल - अंदाजे १३ किमी
वैशिष्ट्ये - दमवणारा गायदरा घाट आणि रंगतदार सिद्धगड. तीन दिवस संपले. अजून दोन बाकी.

# सह्यांकन २०११ - भाग ५

## सिद्धगडमाची ते मुक्काम भीमाशंकर व्हाया भट्टीचे रान

आजूबाजूला कितीही 'घोरासूर' पसरलेले असले तरी मोहिमेत सुदैवाने त्यांच्यामुळे एकदाही माझी झोपमोड झाली नाही. बरोब्बर पाच वाजता आपोआप जाग यायची आणि उठायचा सर्वप्रथम प्रचंड कंटाळा यायचा. मग कालचा दिवस कसा गेला, आज किती चाल आहे हे आठवून हळूहळू प्रोसेसिंग सुरू व्हायचं. एकवेळ बेड-टी मिळाला नाही तरी चालेल पण 'साडेसहाच्या आत शूज घालून आणि सॅक पॅक करून तयार असलेलं बरं' या निर्णयाला पोचलो की मग आपोआप स्लीपिंग बॅग उघडली जायची आणि आतून अस्मादिकांचा देह बाहेर पडायचा. थोडक्यात, तीन दिवसांत एक मस्त रूटीन बसलं होतं.

आदल्या दिवशी झोपण्यापूर्वी, मुक्कामाची व्यायामशाळा कँपच्या मुख्य ठिकाणापासून बाजूला असल्यामुळे, 'सर्वांना साडेपाच वाजता तिकडे घेऊन ये' अशी आज्ञा बल्लूने मला दिली होती. त्यामुळे लीडर- को लिडर नंतर लीडर इन प्लेस म्हणून त्या दिवसापुरता मी को को लीडर उर्फ कोको झालो होतो. सर्व मोठ्यांना चहासाठी उठवण्याचे सबुरीचे प्रयत्न निष्फळ ठरल्यानंतर मग मात्र मी थेट पद्धत स्वीकारली आणि चहाची किटलीच कँपातून उचलून व्यायामशाळेत आणून ठेवली! (सगळे खूश झाले हे लिहायला हवंच का?)

अचानक, डाव्या गुडघ्याच्या डाव्या बाजूचा स्नायू दोन वर्षांपूर्वीच्या तोरणा-रायगडमध्ये जसा मधूनच दुखायला लागला होता त्याचे पूर्वसंकेत देऊ लागला आणि मी टेन्शनफुल झालो! अजून दोन पूर्ण दिवस बाकी होते! भट्टीच्या रानातील सपाटीचे टेंशन नसले तरी त्याआधी गायदरा घाट चढायचा होता. गुडघा आत्ता दुखत नसला तरी तो केव्हाही दुखू शकत होता या शक्यतेमुळे गायदऱ्यापर्यंत अतिशय काळजीपूर्वक पाऊल टाकणे हाच एकमेव उपाय होता.

उपमा खाऊन आणि पॅकलंच घेऊन बरोब्बर साडेसातच्या ठोक्याला सिद्धगडमाचीचा निरोप घेतला. जिथे जिथे एखाद्या मोठ्या पायरीइतकी उंची चढायची अथवा उतरायची असेल, तिथे तिथे त्याच्या आसपासच्या छोट्या दगडांचा आधार घेत ती उंची कमी करायची आणि मग पाऊल टाकायचे, अशी सोपी, नेहमीची पद्धत मी वापरली. गायदऱ्याच्या पायथ्यापर्यंत तर मी इतका काळजीने चालत होतो, की ते स्टेपींग माझ्या मागून चालणाऱ्या आठवलेकाकांच्याही लक्षात आले. आणि त्यांनी, 'काय पायाची काळजी घेतोयस का?' असं विचारून टाकलं! ('मी तुझी सॅक घेऊ का' असं मात्र पूर्ण मोहीमभर कुणीही कुणालाही चुक्कुनही विचारलं नाही!)

साडेआठ - गायदरा पायथा आणि सव्वा नऊ - गायदरा टॉप! कोंडवळ गावात भीमाशंकरची जीप दुपारी चार वाजता येणार होती. त्यामुळे जवळजवळ आठ तास वेळ हातात होता. भट्टीच्या रानातून कोंडवळचे अंतर दोन-अडीच तास होते. वेगात जाणाऱ्या बॅचला आवरायचे लीडर्सचे कौशल्य कौतुकास्पदच होते. दुसरी बॅच आमच्याच कालच्या वाटेने सिद्धगडमाचीकडे जाणार होती. त्या बॅचची वाट पाहत वाटेवरच्या काल येताना बसलो त्याच विहीरीपाशी (वेळ काढत) बसायचे असे लीडर्सनी ठरवले.



त्या विहीरीपर्यंत पोचायला फारतर दहा मिनीटे लागली असती आणि आमच्या कालच्या अनुभवावरून दुसरी बॅच एवढ्या लवकर तिथे पोचणे शक्यच नव्हते, म्हणून आम्ही गायदरा टॉपवरच मैफल जमवली. हे एक बरे होते! बॅचमध्ये एक से एक नमुने भरलेले

असल्यामुळे, चालताना मुख्यत्वे लांबामुळे आणि थांबल्यावर इतरांमुळे विश्रांतीच्या जागा हसण्या-खिदळण्याने जिवंत व्हायच्या. after all, एखादा ट्रेक म्हणजे नुसतीच वेळेमागे केलेली पायपीट थोडीच असते? डोंगराच्या कुशीत, पायवाटेशेजारी बसून रानफुलांच्या सान्निध्यात ऐकलेली एखादी कविता, एखादं गाणं, एखादा पोट फोडून हसवणारा किस्सा ट्रेकला अविस्मरणीय बनवून जातात! सुदैवाने, असे योग या बॅचच्या नशिबात बऱ्याचदा आले. सतत २४x७ आमचं तोंड सुरू असायचं - दिवसा बोलण्यासाठी आणि त्या 'कष्टां'मुळे रात्री घोरण्यासाठी!

पावणे दहा वाजता ती मैफल थांबवली आणि पाणी पिऊन विहीरीकडे निघालो. विहीरीजवळ यायला फारतर दहा वाजले असतील. येऊन पाहतो, तर तिथे दुसरी बॅच




आमच्या आधीच पंधरा-वीस मिनिटे येऊन पोचली होती! हा धक्काच होता! याचा अर्थ, आमच्यापेक्षा पटसंख्येने अधिक असूनही त्यांचा चालण्याचा वेग आमच्याइतकाच होता. तो धक्का नव्हताच हे स्वतःलाच दाखवण्यासाठी मग त्यांनी ढाकोबा कँपवरून आणलेले काही पराठे आम्हीच खाल्ले. थोडावेळ विहीरीपाशी रेंगाळलो. कशावरून निघाला ते माहित नाही, पण विहीरीजवळच्या चर्चासत्राचा विषय होता - 'कुत्रा गाडीच्या चाकात सापडून झालेले अपघात तसेच रेबिज झाल्यास होणारे परिणाम'! सहभागी वक्ते - मी सोडून सगळेच! कारण आजपर्यंत एकही कुत्रा अथवा कुत्री मान अथवा पाय वर करून एकदाही माझ्या अथवा माझ्या बाईकच्या वाट्याला गेलेले नाहीत! (मीही त्यांच्या वाट्याला गेलेलो नाही!) मी त्यांच्या गप्पा ऐकत रिकाम्या आकाशातील कापसासारख्या दिसणाऱ्या ढगांचे पडल्या पडल्या फोटो घेण्यात दंग होतो. त्यातच आदल्या दिवशी रात्री आमच्यापैकी एकाने 'त्यांच्या जेवणाची ताटली धुवायच्या आधी, अहुपेपासून आम्हाला सोबत केलेल्या एका कुत्र्याला चाटून साफ करायला दिली होती' हे आठवून सांगितले. एतेन विषय कंटिन्युड!! तात्पर्य, विषयांना तोटा नव्हता.

अखेर, अर्ध्या तासाने बल्लूने मोहीम पुढे नेण्याचा आदेश दिला. लगेच सतरा ट्रेकींग सॅक्स आपापल्या मालकांच्या पाठीवर निवांत बसून पुढे निघाल्या. इथून पुढची वाट अगदीच सपाट, सरळ आहे. इतके दिवस अनवट वाटांनी सह्याद्रीत फिरल्यावर ही वाट म्हणजे राष्ट्रीय महामार्ग असल्याचाच भास होत होता. दमदम्याच्या डोंगरावरून भट्टीच्या रानातून दक्षिणेकडे रमतगमत ही वाट जाते.



(अवांतरः मागच्या आठवड्यात पुण्याला जाताना ट्रेनमध्ये मी फोटो एडिट करत होतो. माझ्या शेजारच्या माणसाने ते पाहून - 'हे अहुप्याचे फोटो ना?' असं विचारलं. मी खूश! मग

आमच्या गायदरा, अहुपे, आणि तिकडच्या रानवाटा यावर गप्पा झाल्या. त्याच्या नोकरीचं गाव कोंडवळ फाट्यापासून मंचरच्या दिशेला तीन किमी वर होते. तो म्हणाला - 'भट्टीच्या रानामध्ये बिबट्यांवर लक्ष ठेवायला एका पाण्यापाशी एक टॉवर आहे. मला एक रात्र तिथे मुक्काम करायचाय.' यावर मी त्याला खालील फोटो दाखवला. तो खूश!)




हां, तर भट्टीच्या रानातून सर्वात शेवटी मी, पुण्याच्या विद्याकाकू, माहीम, मुंबई-१६ चे विनायक, आणि नाशिकचे लहू डफळे (यांचं यंदाचं ५ वं की ६ वं सह्यांकन होतं) आरामात गाणी म्हणत येत होतो. आम्हाला वेळेचे अजिबातच बंधन नव्हते. त्यामुळे वाटेतल्या एका पाण्याजवळच्या पुलावर जेवणाची पंगत बसवली. पॅक-लंचमध्ये बटाटा भाजी व पोळी होती. प्लस आमच्याकडे चटणी, जॅम (तीन प्रकारचा बरं का!) आणि तोंडी लावायला भरपूर गप्पा होत्याच! जेवण झाल्यावर पुन्हा तिथे मैफल जमली. सुरूवातीचा

विषय होता - 'देव आनंदची गाणी व पृथ्वीराज कपूर यांची डायलॉक फेक'! तिथून तो विषय कुठच्या कुठे गेला हे सांगायला नकोच! 'काकूं'नी येतायेता बनवलेला रानफुलांचा गुच्छ आमच्या दोन प्रेमळ, तत्पर लीडर्सना देण्याचा कार्यक्रमही तिथे पार पडला. एव्हाना, आमचं १९ जणांच एक छोटंसं कुटुंबच तयार झालं होतं ना!




अखेर, पुन्हा तासभर चालून गावंदेवाडीपाशी आलो. तिथे एका गवताच्या गंजीखाली थोडावेळ विश्रांती घेतली. आणि 'पटकन काढता येईल अशी शूलेस कशी बांधावी' यावर लांबाने माझ्या शूजवर प्रात्यक्षिक करून दाखवलं. माझा गाठ न मारता येण्याचा जुना प्रॉब्लेम असल्यामुळे मी ती लेस अजूनही तशीच ठेवली आहे, हा भाग अलाहिदा!

तिथून दीड-दोन किमी चालून कोंडवळला पोचलो. तिथे आमच्यासाठी दोन जीप्स घेऊन विलासदादा (पहिला दिवस - सिंगापूर मुक्काम - पोह्यांचा नाष्टा; आठवला?) आला होता. जीपमधून भीमाशंकरच्या कँपला पोहोचलो तेव्हा फक्त चार वाजले होते.




इथे आमच्या बॅचमधल्या एका मद्रासी (की तेलुगु?) जोडप्याने, आमचा निरोप घेतला. संपूर्ण मोहिमेत सर्वांपासून काहीसे अलग राहिलेले हे दोघेच. बाकी सर्वजण वय, भाषा इ विसरून सहज मिसळून जात असतांना यांनी मात्र आपला स्वतंत्र बाणा कायम ठेवला होता. हिमालयात ट्रेक करतांना वापरतात तशा स्किईंग स्टीक्स घेऊन त्यांनी अख्खा ट्रेक केला. वाट माहित असो वा नसो, ते सतत सर्वांच्या पुढेच असायचे. मग लांबाने त्या स्टीक्समध्ये प्रचंड ताकद आहे असे सांगितले आणि त्या दिवशीच्या भ्रमंतीमध्ये त्यांना ओव्हरटेक करून पुढे जाणाऱ्या प्रत्येकाला त्या स्टीक्सला नमस्कार करायची आज्ञा केली! (लांबाच तो!) गंमत म्हणजे, त्यातल्या बाईसाहेबांनी, पळू गावात सर्वात पहिल्या ओळखपरेडच्या वेळी, पूर्ण बॅचमध्ये चेहऱ्यावरून वयस्क दिसणाऱ्यांनीही स्वतःचं वय सांगितलेले नसताना नावानंतर ताबडतोब वयच जाहीर केलं! (चुकून सांगितलं असेल! दुसरं काय! पण वागायला दोघेही फार मदतशील होते बरं!) असो.

३२५० फूट उंचीवर असलेल्या भीमाशंकर स्थानाची वेगळी ओळख करून द्यायची गरजच नाही. भीमाशंकरचा कॅंप एका मंदिराशेजारच्या भल्यामोठ्या ओसरीवर होता.

ओळखपरेड वगैरे झाल्यानंतर 'उरलेला रात्रीपर्यंतचा वेळ कसा घालवायचा' हा प्रश्न पडता पडता सुटला! कँपलीडर पराग आपण भीमाशंकर दर्शन किंवा नागफणीला जाऊ शकतो असं बोलला आणि दर्शनाला येऊ शकत नसल्याबद्दल मी मनातल्या मनात श्रीभीमाशंकराची क्षमा मागून टाकली. दुर्गमोहिमेवर असल्यामुळे मूर्तीपेक्षा कातळांमध्ये देव सापडण्याची शक्यता जास्त होती!




नागफणी!! आम्ही बारा जण, विलासदादा आणि एक गावकरी यांना घेऊन निघालो. वाटेत एक हनुमानाचे मंदिर लागले. (हीच एकमेव वाट आहे, असं नाही)


नागफणी पश्चिमाभिमुख असल्यामुळे सूर्यास्त पाहण्याची गेल्या चार दिवसातली मनोकामना पूर्ण होणार होती. वेळापत्रकाची पुरेशी धास्ती घेतल्यामुळे विलासदादाला आणि लांबाला 'सूर्यास्त झाल्याशिवाय खाली उतरायचं नाही' अशी गयावया करून घेतली. दोघांनीही होकार दिला. (याला म्हणतात अनुभव!) तासाभरात नागफणीवर पोचलो. डाव्या हाताला पदरगड अगदी जवळ दिसत होता. उद्याच्या पदभ्रमणात पदरगड होता. मोहिमेतील शेवटचे खांडस गाव खाली दूरवर दिसत होते. कालचा सिद्धगड उत्तरेकडे उठून दिसत होता. साखरमाचीचा डोंगर, दमदम्या, भट्टीचे पठार डोळे भरून पाहून घेतले.

पदरगडाची पहिली नजरभेट -


Nachiket Joshi


Nachiket Joshi

मागे पुसटसा सिद्धगड, जिथे आम्ही काल होतो -



आणि (अपेक्षेप्रमाणे) सूर्यास्त व्हायच्या आधीच सर्वांनी खाली उतरायला सुरूवात केली. साडेपाच वाजले होते. सूर्य अजून वीस-पंचवीस मिनिटात बुडणार होता. उतरताना एक झाडीतून जाणारा पट्टा होता आणि मग पठारावरून मोठी वाट कँपकडे जात होती. अखेर लीडर्सलोकांची परवानगी घेऊन झाडीतल्या त्या उतारावरही आणि पुढच्या पठारावरही धावत सुटलो. (गुडघे-बिडघे सह्याद्रीदेवाच्या हवाली!) निवांत बसून सूर्यास्त बघण्यासाठी ही शेवटची संधी होती and I wanted to give my best! ती एकूण वीस-पंचवीस मिनिटांची वाट जेमतेम साडेआठ मिनिटात कापून कँपच्या मागच्या बाजूच्या कड्याच्या टोकाशी पोचलो, तेव्हा सूर्याचा खाली जाता जाता ढगांशी लपाछपीचा खेळ सुरू झाला होता. काही मिनिटांची स्वस्थता मिळवण्यासाठी आधी तुफान धावपळ करावी लागली हा विरोधाभास इथेही सोबत होताच! पण डोळ्यासमोरचा सूर्यास्त पाहत असताना ते सगळे विचार हळूहळू पुसले गेले.







कँपमध्ये परतल्यावर जेवण तयार होईपर्यंत प्रशस्तीपत्रक आणि अभिप्रायाचा एक छोटासा औपचारिक कार्यक्रम आयोजित केला गेला होता. 'सह्यांकन'च्या आयोजनाला तोडच नव्हती. त्यामुळे त्याबाबतीत सर्वच खूश होते. बाकी एक-दोन किरकोळ सुधारणा आमच्याकडून सुचवल्या गेल्या व त्या कँपलीडरने आज्ञाधारकपणे वहीत टिपून ठेवल्या.

जाता जाता 'कमी खायला द्या' अशीही उपसूचना कोणीतरी केलीच. त्यानंतर मोहिमेतला शेवटचा खाना म्हणून पेशल 'गाजर का हलवा' होता. (काय अप्रतिम चव होती म्हणून सांगू!!) सोबत पुऱ्या, छोले, कोशिंबीर, पापड, दाल-भात!! जेवल्यावर हात धुवायलाही उठण्याची अंगात ताकद नव्हती!

पुन्हा लांबासमोर पाय पसरून बसलो आणि आज पोटऱ्यांसकट पावलांना मालिश करून घेतले. थंडी चांगलीच होती. झोपण्यासाठी छप्परबंद ओसरीवर किंवा मग समोरच्या मंदिरात सोय होती. आठवलेकाकांच्या सांगण्यावरून मी त्यांच्यासोबत ओसरीवरच झोपायचे ठरवले आणि एक योग्य निर्णय घेतल्याची खात्री दुसऱ्या दिवशी पटली. रात्री मंदिराच्या फरशा प्रचंड गार पडल्या आणि तिथे झोपलेले अजूनच कुडकुडले. आम्ही मात्र एकदम टुणटुणीत होतो.

झोपताना पहिला विचार कुठला आला असेल तर, 'मोहिमेतली ही शेवटची झोप' हाच! हां हां म्हणता चार दिवस संपले होते आणि उद्या एव्हाना आम्ही आपापल्या घरी असणार होतो...



आजचा हिशेबः
२३ डिसेंबर २०११
एकूण चाल - अंदाजे १२ किमी
वैशिष्ठ्ये - 'नागफणी' हे सरप्राईज पॅकेज!, एकमेव अप्रतिम सूर्यास्त. मोहिमेमधला शेवटचा मुक्काम. उद्या संपणार हे सर्व...


# भाग ६ (अंतिम) : पदरगड आणि निरोप

आयुष्यात जपून ठेवावे असे क्षण अधूनमधूनच का येतात? सुरूवातीला वाटलेल्या 'पाच दिवसांचा एवढा मोठा ट्रेक जमेल का' या धाकधुकीचं 'मोहीम अजून एखादा दिवस सुरू राहिली तर किती छान होईल?' अशा दिलासा देणाऱ्या आत्मविश्वासात रूपांतर कधी झालं? उद्या सकाळी जाग येईल तेव्हा काय वाटेल? इतके मोकळे श्वास पुन्हा कधी घ्यायला मिळतील? एंडलेस क्वेश्चन्स.... जाग आली तेव्हा बाहेरही अंधार होता, आणि आतही हिरमुसलेली सावली पडली होती. कारण काहीच नाही, रानवाटांच्या सोबतीची सवय झाली की मग पुन्हा शहरी 'विराण'वाटांत शिरताना जीव हुरहुरतो.

बल्लूने पीटीला सुटी दिलेली असूनही आम्ही न सांगता, न बोलावता आपणहून पीटीसाठी जमलो. पूर्ण दिवसाच्या भ्रमंतीकरिता शरीराला हलका व्यायाम आवश्यक असतो हे पटल्यामुळे असेल किंवा उद्यापासून हे करणार नाही, हे जाणवल्यामुळेही असेल. सकाळी विद्या'काकू' व त्यांचा भाचा जय (उर्फ यत्ता आठवी) पुण्याला निघून गेले. आता आम्ही केवळ १५ (लीडर्ससह) जण उरलो होतो.

वेळापत्रकानुसार दोनवेळा चहा, मिसळ-पावचा नाष्टा, पॅक-लंच घेऊन बरोब्बर साडेसातला निघालो. आजच्या वेळापत्रकात होते - पदरगड उर्फ कलावंतिणीचा महाल व गणेश घाटाने उतरून खांडस येथे सांगता. खांडसच्याही पुढे जिथपर्यंत रस्ता येतो, तिथे चार वाजता परतीची बस येणार होती. त्यामुळे पदरगड बघून तीन वाजता उतरायला सुरूवात केली असती तरी गणेश घाटाने वेळेत पोचलो असतो.

भीमाशंकर सोडून जंगलात घुसल्यावर सकाळचे सर्व भावनिक विचार नाहीसे झाले आणि जणू काही मोहिमेचा पहिला दिवस असल्याप्रमाणेच वाटचाल सुरू झाली. नागफणीचा डोंगर डाव्या हाताला ठेवून एक वाट वळसा घालत खाली उतरते. फार सुंदर वाट आहे ही! तास-दीड तास चालून आम्ही एका पठारावर आंब्याखाली आलो. हा आंबा खूप प्रसिद्ध आहे. कारण तिथून तीन वाटा फुटतात. उजवीकडची पदरवाडी गावात जाते. मधली शिडी घाटाकडे जाते आणि सर्वात डावीकडची पठार ओलांडून पदरगडाकडे व तशीच पुढे गणेश घाटाकडे जाते.




पदरगडाकडची वाट सुंदर आहेच. कसा निघाला माहित नाही, पण गप्पांचा विषय होता, 'मधुबाला, स्मिता पाटील आणि इतर जुन्या हिंदी अभिनेत्री'! त्यामुळे वाट अधिकच सुंदर झाली हे सांगायला नकोच! मग ओघानेच मराठी चित्रपटांबद्दलही एकमेकांत ज्ञानवितरण झाले. लांबा आणि बल्लू पुढे चालत होते. त्यांनी शेकरू (भीमाशंकरच्या जंगलात आढळणारी उडती खार) पाहिली आणि फोटॉसाठी मला हाका मारल्या. त्या शेकरूनेही त्या हाका ऐकल्या असाव्यात आणि फोटॉच्या भीतीने धूम ठोकली असावी! माझी

मात्र प्राणी टिपण्याची संधी हुकली! कारण संपूर्ण मोहिमेत माकड वगळता एकाही दोन अथवा चार पायांच्या, चालत्या अथवा सरपटत्या प्राण्याने आम्हाला दर्शन दिले नव्हते.




पठार ओलांडत तासभर चालल्यावर एका विहीरीपाशी आलो. तिथून एक वाट डावीकडे पदरगडाकडे जाते. बल्लू इथे आमच्या सॅक्सवर 'पहारा' देत थांबणार होता. पदरगडाची चढाई आम्ही सुळका चढणार नसल्यामुळे खरंतर टेक्निकल नव्हती. पण सेफ्टी म्हणून सर्वांना बोलाईन बांधण्यात आली. पहिल्या दिवशी दिलेल्या स्लिंगचा अखेर बोलाईनच्या निमित्ताने सदुपयोग झाला. अहुप्याच्या कँपवर अनिकेतने बोलाईन कशी मारावी ते आपणहून दाखवून सुद्धा मला गाठी मारता येत नाहीत, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले! लोक कुठले दोर कुठून कुठून काढून-घालून शेवटी एक फस्क्लास न सुटणारी गाठ बांधतात याचं मला नेहमीच कौतुक वाटतं! असो. १-२ पिट्टू सॅक्स घेतल्या आणि प्रसादच्या मागून निघालो. प्रसाद म्हात्रे हा टेक्निकलसाठी खास बोलावलेला पाहुणा होता. माझी

रॉकपॅचेस मधला वावर बघून 'तयार वाटतोस! एकदा ये बोरिवलीला, एकत्र क्लाईंबिग करू' असे आमंत्रण देऊन गेला. कातळ पाहिले की मला एकदम आपलं वाटायला लागतं, नसलेल्या बारीक बारीक खाचाही दिसायला लागतात आणि हा चिरंतन वृद्ध, प्रेमळ सह्याद्रीबाबा मला स्वतःच्या अंगावर मायेने खेळू देईल, असं काय काय वाटायला लागतं...

वीस एक मिनिटे चालल्यावर जिथे चढ सुरू होणार होता, तिथल्या एका मोठ्या कातळावर नारळ फोडला आणि 'ही चढाई-उतराई यशस्वी होऊ दे' असे डोंगरबाबाला साकडे घातले. सर्व भटके लोक डोंगरापुढे मान झुकवून स्तब्ध उभे होते हे दृश्य मला तरी फार भावले.




पुढचे दोन तास हे संपूर्ण मोहिमेमधले सर्वात थरारक क्षण समजायला हरकत नाही. जेवणाच्या शेवटी पेशल डिश असावी तसा हा अनुभव होता. सरळसोट चढ, एका बाजूला एक्स्पोजर, त्यात स्क्री असा मामला होता. (पण मी मागे भैरवगडावर जाऊन आल्यामुळे मला तरी चौथीची परीक्षा पास झाल्यावर बालवाडीत बसल्यासारखं झालं होतं!)



२०२० फूट उंचीच्या पदरगडाचे वैशिष्ट्य म्हणजे वाटेमध्ये एक चिमणी लागते. हा एक अरूंद घळीचा प्रकार आहे. चिमणीतून जाताना पाठ मागच्या कातळाला आणि गुडघे दुमडून पावले समोरच्या कातळाला टेकवायची आणि एकदा पाठ-एकदा पाऊल असे सरकवत वर चढायचे किंवा खाली उतरायचे.




बॅचमधल्या सर्वांचा विचार करून लीडर्सलोकांनी त्या चिमणीमध्ये एक कृत्रिम शिडी लावून टाकली आणि चिमणी त्यातल्या त्यात सोपी केली




मी चढताना शिडीवरून गेलो आणि उतरताना मात्र (लांबा जवळपास नाही हे पाहून) मागेपुढे घासटत उतरलो. अर्थात माझ्यापुढे आमच्यासोबत असलेला स्थानिक गावकरी होताच.

पदरगडावर बघायला काहीच उरलेले नाही. पण एक अतिशय मोक्याच्या जागी असलेला राखणदार म्हणून पदरगड बघता येईल. पदरगडावर एक सुंदर गुहा आहे. त्यात मुक्काम करता येऊ शकतो. जवळच पाण्याचे टाके आहे.

वर पोचलो.

त्या सुळक्याच्या डावीकडून -





गु

गुहेकडे जाणारी वाट -

हेमध्ये शंतनु आणि सचिन - (समोर खाली दिसणाऱ्या झाडीत शिडी घाट आहे)



पदरगडावरून दिसणारा शिडी घाट –



भीमाशंकर-नागफणीचे डोंगर -




अतिशय सुंदर, रांगडी वाट येंजॉय करत पदरगड उतरलो तेव्हा फक्त पावणेदोन वाजले होते. म्हणजे आम्ही वेळापत्रकाच्या पुढेच होतो. (आता जेवायला निवांत वेळ मिळाला असता!) विहीरीपाशी पंगत मांडली.

ताक विकायला आलेला एक गावकरी भेटला आणि काही क्षणांत त्याची ताकाची कळशी रिकामी झाली! इथे लीडर बल्लूने आमचा निरोप घेतला. आमचा बॅच लीडर आता पुढचे चार दिवस भीमाशंकरचा कॅंपलीडर म्हणून काम करणार होता. स्लिंग्स 'चक्रम'च्या आयोजकांना परत दिल्या आणि अडीच वाजता आम्ही 'सह्यांकन २०११' मधला शेवटचा उतार उतरायला सुरूवात केली.


गणेश घाटाची वाट आजच्या आतापर्यंतच्या वाटांच्या तुलनेत प्रशस्त होती. पदरगडाच्या पठारावरून गडाला मागे ठेऊन वळणं घेत वाट उतरते.

वाटेत डोंगरांच्या कुशीत गणपतीचे एक मंदिर आहे. तिथे थोडावेळ थांबलो.

तिथून उतरताना डबल बोअर बंदुका घेऊन जंगलात प्राणी मारायला चाललेले पाच-सहा जण दिसले. त्यांना पाहून मला गणेश घाटामध्ये संध्याकाळच्या वेळी घडलेल्या लूटमारीच्या ऐकलेल्या कहाण्या आठवल्या. लांबाला त्याबद्दल विचारल्यावर 'ट्रेकर म्हणवणाऱ्या माणसाला सूर्य मावळल्यावर या वाटेने उतरू नये हे कळण्याइतकी अक्कल पाहिजे ' असं लांबाष्टाईल उत्तर देऊन सगळेच प्रश्न संपवून टाकले.

मग अर्धा पाऊण तास उतरलो असू. बसपर्यंत पोहोचण्यासाठी अजून किती चालावे लागेल असा विचार करत असतानाच पुढ्यातली वाट अचानक उघडली आणि ध्यानीमनी नसताना समोर रस्ता आणि बस दिसली! संपूर्ण मोहिमेमधला तो सर्वात सुखद धक्का होता! अगदी अगदी खरं सांगायचं, तर गेले पाच दिवस इतके फिरलो, भटकलो, दरवेळी पुढे जायची ओढ असायची. पण ती बस दिसल्यावर मात्र तिथपर्यंतची पन्नास पावले अजिबात टाकू नयेत, असं फार फार वाटून गेलं...यथावकाश सर्व १३ लोक्स व लांबा बशीपाशी पोचले व एक लास्ट ग्रुप फोटोसाठी सर्वांना उभे केले.






मग

खांडसमध्ये चहा-वडापाव, तिथून निघाल्यावर बसमध्ये एकमेकांचे इमेलपत्ते घेणे, घरी पोचल्यावर तासभर आंघोळ करण्याच्या गप्पा, फोटो पाठवण्याचे, गटग करण्याचे वायदे, आणि क्षणाक्षणाने निरोप घ्यायची जवळ येणारी वेळ...... बाकी काहीच नाही!

डोंगरदऱ्यांमधला क्षणिक मुक्कामानंतर बिनपंखांच्या पक्ष्यांचा प्रवास आता पुन्हा आपापल्या घरट्यांच्या दिशेने सुरू झाला होता...

आजचा हिशेबः
२४ डिसेंबर २०११
एकूण चाल - अंदाजे ८ ते ९ किमी

वैशिष्ट्ये - सलग तिसऱ्या वर्षी योगायोगाने तोच दिनांक (२४ डिसेंबर) ट्रेकमध्ये घालवल्याचं एक समाधान वगैरे! पदरगडाची सुंदर चिमणी, रॉकपॅच. तेवढा चढ सोडला, तर नुसता उतारायचा प्रवास. 'सह्यांकन' संपताना मनात केलेल्या हिशेबात उरलेली केवळ - 'जमा'! 'खर्च' नगण्यच!

**************


## उपसंहार

एक आनंदयात्रा संपली. हा शब्दशः ट्रेक नव्हता. उत्कृष्ट संयोजनामुळे सुसह्य ठरलेली ही एक मोहिम होती. हाही अनुभव मोलाचाच! शिखराकडे पोचण्याची घाई करण्यापेक्षाही वाटेवर मिळणारी अनुभवांची शिदोरी बांधून घेण्याचे हे दिवस आहेत! 'मी'ला मान मिळण्याआधी त्याचा दर्जा वाढावा यासाठी सुरू असलेली ही प्रामाणिक मेहनत आहे. सांगण्यासारखं, लिहिण्यासारखं जे जे होतं, ते सांगून झालंय. तुम्ही इतक्या चिकाटीने हे सगळं वाचलंत, त्याबद्दल, प्रिय वाचकहो, मनापासून आभार! 'सह्यांकन २०११' मध्ये जितकं फिरलो, जगलो, ते वाचकाच्या डोळयापुढे उभं राहिल इतपत तरी लिहावं हा एकमेव प्रयत्न यामागे होता. संपूर्ण मोहिमेमध्ये आम्ही एकमेकांची व संयोजकांचीही जी यथेच्छ थट्टा केली, त्यातला काहीकाही भाग इथे प्रसंगोचित वाटला आणि मोहिमेइतकंच जड आणि दीर्घ लिखाण हलकंफुलकं व्हावं म्हणून लिहीला गेला. एखादा शब्द भरीचा झाला असल्यास क्षमा! गांभीर्याचं वातावरण असेल तर अशा लांबलचक मोहिमा कंटाळवाण्या होतात. 'सह्यांकन २०११' त्याला पूर्ण अपवाद होती!

साडेतीन हातांच्या मर्यादेमध्येही अमर्याद शक्ती लपलेली असते आणि ती सोबत्यांना देत-घेत पुढे जाण्यात प्रवासाची खरी मजा असते हे पुन्हा उमजलं. मिळालेला वेळ (सोप्या शब्दात त्याला 'आयुष्य' म्हणतात) सार्थकी घालवणं म्हणजे काय करणं, याची नवी उत्तरे मिळाली. 'कुठलीही वाट चुकीची नसते, ध्येयाकडे जाणाऱ्या वाटेला जाऊन मिळणं हे सगळयात महत्वाचं' हे डोंगरातल्या चुकलेल्या वाटांनीच किती सहजपणे शिकवलंय! हे सारं संचित आता मनाच्या असंख्य वाटांनी बाहेर यायला उत्सुक असलं तरी माझ्या शब्दांमध्ये मावणारं नाही! भरभरून सांगावं, उलगडून दाखवावं आणि दरवेळी नवीन शिकत राहावं

असं बरंच काही या प्रेमळ सह्याद्रीबाबाच्या घाटा-वाटांमध्ये लपलंय. ते अनुभवण्यासाठी पुढच्या वेळी अशाच कुठल्यातरी कड्या-कातळावर, सांदी-कपारीखाली, ओढ्या-नाल्यांमध्ये भेटू!

तोपर्यंत... शुभास्ते पन्थानः सन्तु |






# www.esahity.com

इंटरनेटच्या युगात नेटचा वापर करून मराठी साहित्य आणि मराठी बाणा यांचं संवर्धन करण्यासाठी काम करणाऱ्या व्यक्ती आणि ग्रुप्सबरोबरोबर ई साहित्य प्रतिष्ठान एकत्र काम करून निरनिराळी ई पुस्तके आणि ई नियतकालिके बनवीत असते आणि सुमारे दोन लाख लोकांना ई मेलद्वारे त्याचे वितरण करते. त्याला पुढे पाय फ़ुटत रहातात आणि ही पुस्तके (वाचकांच्या आवडीनुसार) पुढे वर्ष वर्ष सर्क्युलेट होत रहातात.

मराठी भाषा आणि मराठी बाणा निरनिराळ्या अंगांनी व्यक्त होत असतात. कविता, कथा, कादंबऱ्या यांसारखेच प्रवासवर्णन हे एक साहित्याचे अंग आहे. नचिकेत जोशीं यांचे ट्रेकवरचे हे दुसरे पुस्तक कसे वाटले ते नक्की कळवा. तुमच्या फ़ीडबॅकवरच लेखकांचे पुढचे लिखाण अवलंबून असते. त्यामुळे आपण या

उद्याच्या साहित्यिकांना आज आपले दोन शब्दांचे प्रोत्साहन तर पाठवाच. हे पुस्तक आवडले तर आपल्या मित्रांना फ़ॉरवर्ड करा. मराठी भाषेवर प्रेम आणि मराठी बाण्याचा अभिमान असणाऱ्या लोकांचे ई मेल पत्ते आमच्याकडे पाठवा.

आम्ही पुस्तके विकत नाही. वार्षिक वर्गणीही नाही. पुस्तकांत जाहिरातीही नसतात. देणग्याही नाहीत. मात्र आम्हाला आठ किंवा त्याहून अधिक ई मेल पत्ते पाठवणाऱ्या व्यक्तींना आम्ही आमचे पाठिराखे म्हणून अधिक महत्त्व देतो. प्रत्येक पुस्तकाची पहिली मेल त्यांना जाते. पुढील योजना त्यांच्याशी शेअर करतो. त्यांच्या सूचनांना अधिक वजन देतो. तुम्ही दिलेल्या ई मेल्सचा वापर मराठी साहित्य सोडून इतर कशाहीसाठी केला जात नाही.

आठ mail ID पाठवा.

आमचे पाठिराखे व्हा.

नवीन लेखकांचे पाठिराखे व्हा.

मराठी तुमच्या पुढल्या पिढ्यांची पाठराखण करील.

# esahity@gmail.com